Estd. 1999

SURYADATTA® EDUCATION FOUNDATION

(Trust Registration No. : MAH/1214/2000 Pune Society Registration No.: F17505 dtd.25/01/2001)

(ISO 9001-2008 Certified Institutes by AQA International, LLC, USA)

Regd. Office : 2074, Sadashiv Peth, Vijayanagar Colony, Pune - 30, Maharashtra, INDIA

SGI Campus : Survey No. 342, Patil Nagar, Off Chandani Chowk - Pashan Road, Bavdhan (Bk), Pune - 21

Tel. No. : +91 20- 24330425, 24336000 M. +91 9763266829 Fax No. : 020 - 67901333

Email: support@suryadatta.org, sbc27661@gmail.com Website: www.suryadatta.org

Suryadatta Group Enriching Careers & Enhancing Lives

Business School of International Repute

Prof. Dr. Sanjay B. Chordiya - Founder President, BE(Mech), MMS, MBS, Ph.D., PGDIM, PGDMM, PGDBM, PGDMLM, FAIMA,F.I.P.E., F.I.E. & Chartered Engineer

Ref. No. : SEF/ Date :

कृपया प्रसिध्दीसाठी

१/३/२०१६

**मनुष्यबळ विकास राज्यमंत्री प्रा. राम शंकर कथेरिया यांच्या हस्ते सुर्यदत्तला “ बेस्ट मॅनेजमेंट इन्स्टीटयूट इन महाराष्ट्र ”हा पुरस्कार प्रदान**

**“शिक्षण ही प्रत्येक नागरीकाची प्राथमिक गरज आहे आणि तो त्याचा जन्मसिध्द आधिकार आहे-राज्यमंत्री मनुष्यबळ विकास मंत्री नवी दिल्ली प्रा. राम शंकर कथेरिया यांचे मत**

नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या९व्या द असोसिएटेड चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्री ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय परिषद २०१६ मध्ये डॉ.राम शंकर कथेरिया राज्यमंत्री मनुष्यबळ विकास मंत्री (उच्च शिक्षण) नवी दिल्ली यांच्या हस्ते सुर्यदत्तला “ बेस्ट मॅनेजमेंट इन्स्टीटयूट इन महाराष्ट्र ”हा पुरस्कार प्रदान करण्यात आला . हा पुरस्कार सुर्यदत्त ग्रुप ऑफ मॅनेजमेंटचे संस्थापक व अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडीया यांनी स्विकारला. या वेळी असोचेमचे जनरल सेक्रेटरी डी.एस.रावत उपस्थित होते.

या वेळी डॉ.राम शंकर कथेरिया म्हणाले “ समाजातील सर्व घटकांची वाढ योग्य प्रमाणात होण्यासाठी त्यांना माफक फी मध्ये दर्जेदार शिक्षण देणे ही सर्व शैक्षणिक संस्थांची प्राथमिक जबाबदारी आहे.प्रत्येक मुलाने आपल्या मनाने उच्च शिक्षणासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जात ,धर्म वय, लिंग व प्रदेश याचा कोणताही विचार न करता देशातील समाजातील सर्व वर्गाच्या विद्यार्थ्यांना समान संधी देण्यात येत असलेल्या शैक्षणिक संस्थेला हा पुरस्कार दिला जातो.समाजाच्या कल्याणासाठी संजय चोरडीया यांनी केलेल्या कामाबद्दल डॉ.राम शंकर कथेरिया यांनी अभिनंदन केले व संस्थेला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली. ”

या वेळी संजय चोरडीया म्हणाले “ या आधुनिक जगात सुर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टीट्युटच्या तत्वानुसार प्रत्येकाला उच्च दर्जाचे शिक्षण दिले जात आहे. रेल्वे मधिल हमालांना इंग्रजी बोलणे,ग्रामीण भागातील महिलांनी एकत्र येऊन व्यवसाय करणे व बेकरी कार्यशाळा, शिवण व फॅशन डिझाइन वर्ग ,औद्योगिक संस्थांमधील कामगारांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्या,ज्येष्ठ नागरीकांसाठी कॉम्प्युटर साक्षरता,महिला सक्षमीकरण कार्यक्रम ,मोफत मधुमेह ,हृदयविकार,हाडातील बळकटी ,रक्तदान शिबिरे ,नेत्रदान व एड्सबाबत जनजागृती, पर्यवरण व प्रदुषण कमी करण्याचे उपाय अशा विविध क्षेत्रांमधिल समाजातील सर्व घटकांना ज्ञान प्राप्त करुन देणे व त्यांचे जीवनमान उंचावणे या साठी गेली १७ वर्षे सुर्यदत्त प्रशिक्षण देत आहे. ” या पुरस्काराबद्दल त्यांनी सर्व प्राध्यापक,सहकारी आणि विद्यार्थि यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

शिल्पा आगरकर

नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या९व्या द असोसिएटेड चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्री ऑफ इंडिया समिट २०१६ मध्ये सुर्यदत्तला बेस्ट मॅनेजमेंट इन्स्टीटयूट इन महाराष्ट्र हा पुरस्कार प्रदान करण्यात आला (डाविकडून) सुर्यदत्त ग्रुप ऑफ मॅनेजमेंटचे संस्थापक व अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडीया , राज्यमंत्री मनुष्यबळ विकास मंत्री (उच्च शिक्षण) नवी दिल्ली डॉ.राम शंकर कथेरिया आणि असोचेमचे जनरल सेक्रेटरी डी.एस.रावत